अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# महिला बँकेच्या उद्‌घाटनाचा मुंबईला मान

भारताच्या आर्थिक राजधानीमध्ये देशातल्या पहिल्या वहिल्या पूर्णपणे महिलांसाठी असलेल्या महिला बँकेची मुहूर्तमेढ व्हावी ही अत्यंत सुखावह घटना म्हणायला हवी. या बँकेचे उद्घाटन दिल्लीमध्ये करण्याचे ठरले होते. देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त म्हणजे आज त्याचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात व्हावे, असे केंद्र सरकारच्या मनामध्ये होते. परंतु तिथल्या निवडणुकांच्या भाऊगर्दीमध्ये आचारसंहितेचा बडगा अंगावर होता. म्हणून मुहूर्त तर साधायचे आहेत आणि त्याचे योग्य ते श्रेय घेऊन संदेशही द्यायचा आहे, याकरिता हा उद्घाटन सोहळा शेवटी मुंबईत हलवण्यात आला. आज पंतप्रधान मनमोहन सिंग आणि अर्थमंत्री पी. चिदंबरम यांच्या उपस्थितीत महिला बँकेच्या एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे तोरण बांधले जात आहे. मुंबई किंवा महाराष्ट्राच्या दृष्टीने हा योगायोग म्हणायला हवा. कारण महिलांच्या खऱ्या सक्षमीकरणाचा 'श्रीगणेशा' महाराष्ट्रात केला गेला. महिला चळवळीच्या अनेक सुधारणावादी चळवळी महाराष्ट्रातून सुरू झाल्या. सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी पहिली शाळा याच महाराष्ट्रात सुरू करून एका फार मोठ्या सामाजिक जाणिवेचे दर्शन जगाला घडवले होते. महिला सक्षमीकरणाच्या नुसत्याच बाजारगप्पा न मारता कृतिशील उपक्रम ही काळाची गरज होती. शंभर वर्षापूर्वीच त्याचा पाया रोवण्याचे काम सावित्रीबाई फुलेंसारख्या बुद्धिमान महिलेने केले. आज स्थापन होत असलेली ही बँक सावित्रीबाईंनी केलेल्या महिलाविषयक दृष्टीकोनाचे फार मोठे फळ आहे. महिलांनी आपले कर्तृत्त्व समाजामध्ये आज सिध्द केले त्यामागे सावित्रीबाईसारख्यांच्या कार्याची फार मोठी प्रेरणा आहे, हे मान्य करावे लागेल. योगायोगाने का होईना सावित्रीबाईंच्या महाराष्ट्रामध्ये या महिला बँकेचे उद्घाटन व्हावे हे उचितच म्हणावे लागेल. आज समाजामध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. राजकारणामध्ये किंवा नोकऱ्यांमध्येसुध्दा महिलांसाठी काही जागा आरक्षित केल्या जातात. अनेक प्रकारच्या निर्णयप्रक्रियेमध्ये महिलांना सहभागी करून घेतले जाते. महिला आणि पुरुष ही खरे तर समाजरथाची समान चक्रे आहेत, ती जर समान गतीने फिरत राहिली तर समाजाचा विकास अधिक वेगाने होऊ शकेल यात काही शंका नाही. काळ बदलला आहे असे म्हणत असताना काळाने दिलेला हा संदेश तितक्याच प्रभावीपणे अंमलातसुध्दा आणला पाहिजे. महिला बँकेची स्थापना हा बदलत्या काळाचा संदेश होता. उशिरा का होईना परंतु, भारतासारख्या लोकशाहीवर निष्ठा असलेल्या देशात आर्थिक क्षेत्रात महिलांचे हे स्थान स्वतंत्र मान्य केले गेले हेदेखील मोठे सामाजिक स्थित्यंतर म्हटले पाहिजे.

### आर्थिक स्वावलंबित्व प्राप्त होईल

स्वतंत्र महिला बँक असावी असा निर्णय गेल्या केंद्रीय अंदाज पत्रकाच्यावेळी घेतला गेला. महिला बँकेची उद्दिष्टे ठरवताना प्रामुख्याने महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न विचारात घेतला गेला होता. महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांना जर योग्य आणि पुरेशा प्रमाणात आर्थिक मदत झाली तर त्या कितीतरी मोठे कार्य करू शकतात. हे उदाहरणातून सिद्ध झाले. आज केवळ आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळे महिलांना उद्योगांसाठी किंवा विविध उपक्रमांसाठी पुढाकार घेता येत नाही. प्रामुख्याने ग्रामीण भागातील महिलांना योग्य पध्दतीने कर्ज किंवा पैसा मिळत नसल्यामुळेच त्यांच्याकडे असलेल्या अनेक गुणांचे चीजही होत नाही. महिला बचतगटाने मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचे काम केले. त्यातून प्रेरणा घेऊनच या स्वतंत्र महिला बँकेचे बीजारोपण झाले असावे. आज महिलांना केवळ आरक्षणाच्या कुबड्या देऊन चालणार नाही, तर त्यांच्या गुणवत्तेनुसार त्यांना जर योग्य आर्थिक मदत पुरवली गेली तर त्या स्वावलंबी होतीलच पण समाजालाही एक नवी दिशा देतील. आतापर्यंत सरकारी पातळीवर महिला कल्याणाचे अनेक फतवे जाहीर झाले. त्यांच्यासाठी स्वतंत्र मंत्रालयेदेखील स्थापन झाली. कोट्यवधींच्या योजनाही जाहीर झाल्या. परंतु त्या इतक्या प्रभावीपणे महिलांपर्यंत पोहचल्या नाहीत. कारण महिलांच्या नावाने मधल्या अधिकाऱ्यांनी आणि राजकारण्यांनी त्याचा गैरफायदा घेण्याचेच काम केले. आज जगामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक परिवर्तनाचे वारे वाहत आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे असे असून त्यांच्यातील गुणवत्तेला तितकेसे स्थान दिले गेले नाही. प्रपंच आणि संसारामध्ये गुंतणाऱ्या महिलेला जर नवे आर्थिक साधन किंवा माध्यम उपलब्ध झाले, तर त्याचा एकूणच सामाजिक आर्थिक उत्थानासाठी उपयोग होऊ शकतो, हे यानिमित्ताने अधोरेखित झाले आहे.

### आर्थिक महासत्तेसाठी आवश्यक

भारत आर्थिक महासत्ता होण्याच्या वल्गना करत आहे. परंतु महासत्ता होण्याऐवजी आपल्या देशातील महिलांच्या रुपाने असलेली निम्मी लोकसंख्या जर एकूणच आर्थिक क्षेत्रापासून वंचित राहिली, तर महासत्ता होण्यासाठीदेखील आणखी बराच काळ जाऊ शकतो. आता महिलांसाठी स्वतंत्र बँक निर्माण करण्याच्या या प्रयोगाच्या निमित्ताने जवळपास एक हजार कोटींचा हा निधी केवळ महिलांच्या आर्थिक मदतीसाठी उपलब्ध होऊ शकेल. रोजगार आणि आर्थिक उलाढाल अशा एका महत्त्वाच्या उद्देशाने महिला बँक केवळ महिलांसाठी उपयुक्त ठरू शकते. २०१४ पर्यंत देशभरात पंचवीस शाखा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे. ज्या मुंबईत पहिली महिलांसाठी स्वतंत्र लोकल सुरू झाली, त्याच मुंबईला महिलांसाठी स्वतंत्र महिला बँक सुरू करण्याचा मान मिळावा हे तितकेच महत्त्वाचे ठरते.